# माहिती तंत्रज्ञान संचालनालय

माहिती तंत्रज्ञान संचालनालयासाठी शासकीय/ निमशासकीय सेवेतून गट ब संवर्गातून (उच्चश्रेणी लघुलेखक) सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने मानधन तत्वावर विवक्षित कामासाठी नामिकासूची करण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | संवर्ग | विवक्षित कामाचे स्वरुप | भरावयाचे पद | वय अर्हता व अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | गट ब (उच्चश्रेणी लघुलेखक) | संचालक, माहिती तंत्रज्ञान यांचे स्वीय सहायक म्हणून कामकाज करणे. | १ | • उच्चश्रेणी लघुलेखक पदावरील कामकाजाचा किमान ५ वर्षांचा अनुभव आवश्यक<br>• वयोमर्यादा - ५८ ते ६५ वर्ष |

**नियुक्तीच्या अटी व शर्ती :-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क. सीबीई-१५२५/प्र.क्र.३७/आस्थामं (का.१३) दिनांक १० जून, २०२५ अन्वये नियुक्तीच्या अटी व शर्ती विनयमित करण्यात येतील.

२. करारपध्दतीने संचालनालयामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींला कोणतेही पदनाम असणार नाही.

३. करार तत्त्वावरील नियुक्त व्यक्तीस अर्जित, नैमित्तिक व वैद्यकीय रजा अनुज्ञेय असणार नाहीत.

४. नियुक्तीच्या कालावधीत विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आलेल्या व्यक्तीची असेल.

५. करारपध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय /वित्तीय अधिकार नसतील. अशी व्यक्ती कोणत्याही शासकीय पत्र / आदेश यावर स्वाक्षरी करण्यास पात्र असणार नाही.

६. इच्छूक सेवानिवृत्त अधिकारी यांनी अर्जासोबत स्वत:चा अलिकडीलचा पासपोर्ट साईज फोटो, अर्हता प्रमाणपत्राच्या प्रती तसेच राज्य शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या PPO ची छायांकित प्रत अर्जासोबत जोडाव्यात. तसेच इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून दि. २५.११.२०२५ पर्यंत asstech2.it@maharashtra.gov.in या ई-मेल आयडीवर सादर करावेत.

(कान्हूराज बगाटे, भाप्रसे)
संचालक,
माहिती तंत्रज्ञान संचालनालय